# प्रेस नोट दि.०५/०६/२०२४

## निगडी पोलीस ठाणे तपास पथकाची कामगिरी

## ९० गुन्हे दाखल असलेल्या कुख्यात घरफोडयास व एका सोनारास अटक, निगडी येथील सोनाराचे दुकान फोडल्याचा गुन्हा उघड व २५,०३,४५०/- रु.किं.चा माल जप्त

---

दिनांक-२४/०५/२०२४ रोजी रात्रौ ०९/३० वाजता ते दिनांक २५/०५/२०२४ रोजी सकाळी ०८/३० वाजताचे दरम्यान निगडी प्राधिकरण येथील श्रीलक्ष्मी ज्वेलर्स नावाचे दुकानाचे शेटर उचकटुन त्यातील तिजोरी फोडुन त्यामधील सुमारे ३० तोळे सोन्याचे दागीने, १० किलो चांदी, रोख रक्कम १८,०००/- हजार रुपये व तेथील डिव्हीआर चोरुन नेलेबाबत निगडी पोलीस ठाणे येथे गुरनं. २७२/२०२४ भादवि कलम-४५४,४५७,३८०,४२७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. अशा प्रकारे गुन्हा करुन सदर आरोपींनी पोलीसासमोर आव्हान निर्माण केल्याने सदर बाबत श्री विनयकुमार चौबे पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांनी सदर घटनेबाबत कसुन तपास करण्याच्या सुचना दिल्या होत्या.

त्या अनुषंगाने श्रीमती स्वप्ना गोरे पोलीस उपायुक्त परिमंडळ-१ पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली निगडी पोलीस ठाणेचे वपोनि श्री शत्रुघ्न माळी व पोनि(गुन्हे) श्रीमती तेजस्विनी कदम यांचे नेतृत्वाखाली, तपास पथकातील सपोनि श्री अंबरिष देशमुख व अंमलदार यांनी घटनास्थळावरील व आजुबाजुचे सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषणावरुन सदर गुन्हयात आरोपींनी एक लाल रंगाची श्रेवोलेट एंजॉय गाडी वापरलेचे निष्पन्न करुन पिंपरी चिंचवड व पुणे शहर परिसरातील सरकारी व खाजगी असे एकुण २५० ते ३०० सीसीटीव्ही तपासुन सदर गाडी ही गुन्हा केले नंतर हडपसर भागात गेल्याचे निष्पन्न केले. तेव्हा हडपसर परिसरातील बातमीदारांकडुन माहिती काढता रेकॉर्ड वरील कुख्यात आरोपी नामे विकीसींग जालींदरसींग कल्याणी रा. रामटेकडी हडपसर यास गुन्हयात वापरलेल्या वाहनासह ३ ते ४ दिवसांपुर्वी पाहण्यात आले होते असे कळाले. त्या अनुषंगाने तपास केला असता सदरचा आरोपीवर यापुर्वी दरोडा, घरफोडी, जबरी चोरी, खुन, खुनाचा प्रयत्न इत्यादि गंभीर ९० गुन्हे दाखल असल्याचे तसेच तो नेहमी पत्ते बदलुन राहत असल्याचे माहिती मिळाली. सदर आरोपी हा नेहमी शस्त्र वापरत असल्याने व यापुर्वी पोलीसांवर फायरींग केली गेल्याची माहिती मिळाल्याने त्यास पकडने आव्हानात्मक होते. त्या अनुषगाने निगडी पोलीस ठाणे तपास पथकाने सलग ३ दिवस रामटेकडी हडपसर भागात वॉच ठेवुन दि.३०/०५/२०२४ रोजी रात्री तो त्याचे रामटेकडी परीसरातील घरी येण्याची माहिती मिळाल्याने अतिरीक्त कुमक मागवुन निगडी तपास पथकातील सपोनी देशमुख व अंमलदार, पिंपरी पोलीस ठाणेतील सपोनि अतिंग्रे, पोउनि रायकर व अंमलदार यांनी रात्रौ ०१/०० वा दरम्यान त्याच्या घरास वेढा घालुन व बळाचा वापर करुन त्याचे घरात घुसुन आरोपी नामे विकिसिंग जालिंदरसिंग कल्याणी वय ३५ वर्षे रा. साईबाबा मंदीराजवळ सर्व्हे नं. ११० रामटेकडी हडपसर पुणे यास अटक केली. सदर आरोपीची पोलीस कोठडी घेऊन त्याचेकडे कौशल्यपुर्वक तपास करता, त्याने त्याचे तीन साथीदारासह निगडी पोलीस ठाणे येथील ज्वेलरी शॉप फोडल्याचा, बिबवेवाडी पोलीस ठाणे हद्दित एक बंद फ्लॅट फोडल्याचा, डोंबीवली पोलीस ठाणे हद्दितील एक चारचाकी वाहन चोरल्याचा असे एकुण ३ गुन्हे केल्याचे निष्पन्न केले. सदर आरोपी याने निगडी पोलीस ठाणे येथील गुन्हयातील आरोपीच्या वाटयास आलेले चांदी व सोने दागिने हे सोनार नामे अब्दुल्ला ताहीरबक्ष शेख वय ५८ वर्षे धंदा- ज्वेलर्स रा. फ्लॅट क्र. ७१७, पनामापार्क सोसायटी, पोरवाल रोड, धानोरी लोहगाव पुणे यास विकल्याचे निष्पन्न झाल्याने सदर सोनारास अटक करुन त्याचेकडुन १०० ग्रॅम सोन्याची लगड, ८ किलो ३०० ग्रम वजनाची चांदीची विट, गुन्हयात वापरलेले श्रेवोलेट एंजॉय गाडी, घरफोडीचे सहित्य व दोन तलवार असा एकुण २५,००,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा आणखी तपास सुरु आहे.

**आरोपी कडुन उघड करण्यात आलेले गुन्हे**

| क्र | पोलीस ठाणे | गुरनं व कलम |
|---|---|---|
| ०१ | निगडी पोलीस ठाणे पोआ.पिंपरी चिंचवड | २७२/२०२४ भादवि कलम-४५४,४५७,३८०,४२७ |
| ०२ | बिबवेवाडी पोलीस ठाणे पो.आ.पुणे शहर | १३२/२०२४ भादवि कलम-५४५,४५७,३८० |
| ०३ | डोंबीवली पोलीस ठाणे, पो आ. ठाणे शहर | ५७३/२०२४ भादवि कलम-३७९ |

सदरची कामगिरी मा.श्री.विनयकुमार चौबे, पोलीस आयुक्त सो, मा.श्री.वसंत परदेशी अति.पोलीस आयुक्त सो, श्रीमती स्वप्ना गोरे, पोलीस उपआयुक्त सो.परि - १, मा.राजु मोरे सहायक पोलीस आयुक्त सो चिंचवड विभाग,यांचे मार्गदर्शनाखाली श्री.शत्रुघ्न माळी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक ,श्रीमती तेजस्वीनी कदम पोलीस निरीक्षक (गुन्हे),श्री.अंबरिष देशमुख, सहा.पोलीस निरीक्षक, श्री. अतिंग्रे सहा.पोलीस निरीक्षक, श्री. रायकर पोलीस उपनिरीक्षक, दोन्ही पिंपरी पोलीस ठाणे, निगडी पोलीस ठाणेकडील तपास पथकातील भगवान नागरगोजे,

सुधाकर अवताडे, सिद्राम बाबा, भुपेंद्र चौधरी, राहुल गायकवाड, विनोद होनमाने, दत्तात्रय शिंदे, तुषार गेंगजे, विनायक मराठे, सुनिल पवार, केशव चेपटे, प्रविण बांबळे, कविता वावरे, स्नेहा म्हस्के, तसेच पिंपरी पोलीस ठाणे तपास पथकातील राजेंद्र बारशिंगे,शांताराम हांडे, विजय जानराव, समीर ढवळे, गणेश काकड, दिनेश पुंडे, सचिन आचार्य, दत्ता कवठेकर, तांत्रीक विश्लेषक नुतन कोंडे, सीसीटीव्ही कंट्रोलरुम येथील स्वप्नाली म्हसकर, सारीका अंकुश, यांनी केली आहे.

**(स्वप्ना गोरे )**
**पोलीस उप-आयुक्त**
**परि-१ पिंपरी चिंचवड आयुक्तालय**